ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्यकाळातील शिक्षकांचे शिक्षण

**डॉ.जाधव रमाकांत श्रीहरी**
*शिक्षणशास्त्र महा. अहमदनगर*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**१)शिक्षक शिक्षणाची संकल्पना :— (Concept of Teacher Edcatio)**

शिक्षक प्रशिक्षक (Teacher Training ही संकल्पना बदलली असून त्यास शिक्षक शिक्षण Teacher Education असे म्हणतात. प्रशिक्षणात एखाद्या कौशल्यात तरबेज करण्यावर भर असतो. शिक्षणाचे कार्य प्राथमिक रुपाने सिध्दांतीक अथवा प्रयोगात्मक किंवा दोन्ही प्रकारचे शिक्षण देणे होय, शिक्षण दृष्टी व बुध्दी यांचे प्रशिक्षण देण्याचे कार्य करते

श्री. सी.व्ही. गुडस (C.V. Goods) म्हणतात... ''शिक्षक शिक्षण म्हणजे ज्यात औपचारीक, अनौपचारीक आणि अनुभव अंतर्भूत असून ते व्यक्तिला शिक्षण व्यवसायाची जबाबदारी पेलण्यासाठी आवश्यक असेलेली पदवी प्रदान करतात''

विद्यार्थ्यात नवोपकमशीलता विकसीत करणे हेच शिक्षकांचे शिक्षण होय.

**मनसे :—** शिक्षक शिक्षणात सर्व शैक्षणक क्रिया अंतर्भूत असून त्या व्यक्तिला शालेय शिक्षणासाठी तयार करतात.

**२) शिक्षक—शिक्षणाचे महत्व :— Importance of Teacher Education**

शिक्षक हा घडवावा लागतो. तो घडवितांना त्याचे शील, गुणवत्ता, दर्जा यांचेकडे विशेष लक्ष द्यावे लागते. म्हणून शिक्षक शिक्षणात सातत्याने सुधारणा करणे गरजेचे असते. शिक्षण ही भावी जीवनाची गुंतवणूक समजली जाते. पण शिक्षणावर कमी खर्च करण्यात येतो. पण कमी खर्चात चांगले शिक्षण देवून विद्यार्थी तयार करण्याची गुणवत्ता, योग्यता व दर्जा शिक्षकांत यावयास हवी नविन शैक्षणिक पध्दती, संगणक, शिक्षण व वापर, भविष्यातील शै. आव्हाणे पेलण्याचे सामर्थ्य शिक्षकात असणे गरजेचे आहे.

शिक्षक शिक्षणाचे योग्य शिक्षक निर्माण होणे गरजेचे आहे. शिक्षकाचे व्यक्मित्व विकसित करणे, योग्य नागरीक तयार करणे. अध्यापनाविषयी जिज्ञासा व अभिरुची निर्माण करणे आवश्यक असते. अधिकाधिक शैक्षणिक जाणीवा निर्माण करुन शिक्षक तयार करावा लागतो.

**२) शिक्षक शिक्षणाची उद्दीष्टये :— Objectives of Teacher Edcuation**

- जबाबदार नागरीक म्हणून वागण्याची क्षमता
- शिक्षकाच्या निहित क्षमता वाढविणे.
- पालक व विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविणे.
- स्वत:च्या अस्मितेची जवपणूककरणे.
- आपले ज्ञान अद्यावत ठेवणे.
- भौतिक व मानवी साधन सामग्रीचा योग्य वापर करणे.
- पालकांना मार्गदर्शन करणे.
- समाजशास्त्रीय गतिशीलतेचे ज्ञान व त्याचे उपयोजन करणे.
- तात्विक अधिष्ठाण प्राप्त करणे.

**४) शिक्षक शिक्षणाचे प्रकार :— Type of Teacher Education**

शिक्षक शिक्षणाचे दोन प्रकार पडतात

१) सेवापूर्व शिक्षक शिक्षण — Pre Service Teacher Edcuation)

२) सेवार्गत शिक्षक शिक्षण — In Service Teacher Education

अभ्यासक्रमाची पुनर्रचना, नविन अध्यापन पध्दती, पाठयवस्तु आणि अध्यापन यात बदलणाऱ्या स्वरुपात व्यवसायिक समस्यांचाचं विचार केला जातो. व्यवसायात पदार्पन करण्या अगोदर डी.टी.एड, एम. एड. च्या अभ्यासक्रमातून अध्यापनातील कौशल्ये आणि अध्यापन क्षेत्रातील ज्ञानप्राप्ती करुन घेणे गरजेचे असते. त्यास सेवापूर्व Pre Service Education म्हणतात. शिक्षकांच्या सेवाशर्ती व वेतनश्रेणी चांगल्या झाल्यामुळे या क्षेत्रात येणाऱ्यांची संख्या वाढली तसेच अनेक समस्या सुध्दा वाढल्या.

**सेवापूर्व शिक्षक शिक्षणाच्या समस्या —**

१) दोन विषयांच्या अध्यापन पद्तींची निवड

२) अध्यापनाच्या माध्यमाचा प्रश्न

३) सराव पाठांची समस्या

४) अध्यापन साहित्याचा वापर

५) योग्य प्राध्यपकांचा अभाव

**सेवांतर्गत शिक्षक—शिक्षण— In-service Teacher Edcuation**

शिक्षक सतत जागरुक व अद्यावत राहण्यासाठी त्यांना वेळोवेळी अध्ययन करण्याची संधी प्राप्त झाली पाहिजे सतत ज्ञानदान करणाऱ्याने सतत ज्ञानग्रहण केले पाहिजे. शिक्षकाने आजच जगातील ज्ञानप्रवाह, नवी अध्यापन तंत्रे, नवे दृष्टीकोन आत्मसात केले पाहिजे. हल्ली ज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड वाढ होत आहे.

व्याख्या — १) एम्.बी. बूच (M B Buch)

''सेवांतर्गत शिक्षक शिक्षण एक कृतिबध्द योजना असून त्याचा उद्देश शिक्षक आणि शैक्षणिक सेवा कर्मचारी यांचा सातत्याने विकास करणे होय''

२) केन (Canne) १९६९— ''अशा सर्व कृती व पाठयक्रम की, ज्यांचा उद्देश सेवांतर्गत शिक्षकांच्या व्यवसायिक गुणांना कायम करुन त्यांची इच्छा शक्ती आणि कौशल्यांचा विकास करणे असते.

**सेवांतर्गत शिक्षणाची उदद्दीष्टये :—**

१) शिक्षकांच्या अध्यापन विषयातील प्रगतीची शिक्षकाला जाणीव करुन देणे.

२) अध्यापन क्षेत्रातील नवनविन संशोधनाची व विकसित झालेल्या अध्यापन पध्दती व तंत्राची माहिती करुन देणे.

३) विविध विचार प्रवाहांची, संस्थंची, संशोधन फलितांची साधनांची ओळख करुन देणे.

४) नवनविन माध्यमांचा व त्यांच्या अध्यापनात परीणामकारक वापर कसा व कोठे करावा याची जाणीव व माहिती शिक्षकास करुन देणे.

५) विद्यार्थ्यांच्या नवनविन गरजा, अभिरुची व वर्तन प्रकार अवगत करण्यासाठी शिक्षकास सक्षम बनविणे.

६) शिक्षकास त्यांच्या अध्यापन विषयाच्या संदर्भात चालू असलेल्या विविध चळवळींचा परीचय करुन देणे.

७) शिक्षकाने अध्यापन व्यवसाय पूर्व अध्ययन केलेल्या अध्यापन विषयांच्या ज्ञानाला उजाळा देणे.

**सेवांतर्गत शिक्षक — शिक्षणाच्या समस्या— Problems related to In-service education**

१) प्रेरक बाबींची अथवा प्रलोभनाची (Incentive ) कमतरता असणे.

२) प्रेरणेचा (Motivation) अभाव

३) अभिरुचीची कमतरता.

४) अनुपयोगी अध्यापन पध्दतीव तंत्राचा वापर

५) अपूर्ण मूल्यांकनाची तंत्रे

६) अनुपयोगी अभ्यासक्रम व पाठयक्रम
७) उपयोगी साधनांचा अभाव
८) शिक्षक शिक्षणाची अपूर्ण संधी असणे.
९) संस्थानिहाय समस्या असणे.
१०) प्रशासकिय समस्या असणे.
११) आर्थिक समस्या असणे.
१२) उद्दिष्टांचे स्पष्टिकरण योग्य नसणे.
१३) पाठपुरावा कार्यक्रमाचा अभाव
१४) सेवांतर्गत शिक्षक—शिक्षण आणि संस्था यात ताळमेळ नसणे.

**समस्यांवरील उपाय Suggestions for the In proment of In-Service Teacher Education**

१) सतत शिक्षक शिक्षणाची मूलभूत धोरण ठरविणे.
२) राष्ट्रीय स्तरावर मूलभूत धोरण ठरविणे.
३) विविध वर्गांच्या शिक्षकांना शिक्षक — शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करणे.
४) शिक्षकास सुरुवातीपासूनच शिक्षक शिक्षणाची व्यवस्था करणे.
५) सतत शिक्षणाच्या तीन श्रेणींचा वापर करणे.
६) सतत शिक्षणास अथिव्यक्तिची गरज.
७) सतत शिक्षणास तज्ञांची गुणवत्ता व योग्यता आवश्यक असते.
८) दोन स्तरावर मूल्यांकन करणे.
९) विस्तार सेवा विभागाचे अस्तित्व टिकवून ठेवणे.
१०) राज्य व राष्ट्रीय पातळीवर प्राथमिकता देणे.
११) सहाय्यक वातावरण निर्माण करण्याची गरज.
१२) कार्यक्रमात भाग घेण्याची नीती तयार करणे.
१३) सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षणात संबंध असणे.
१४) सतत शिक्षक शिक्षणाचे नियोजन व्यापक असावे.

**शिफारसी**

१) विविध कार्यवाहिनींचे सहकार्य मिळविणे — उदा. विस्तार सेवा केंद्र राज्य शिक्षण संस्था, राज्यस्तरावरील शिक्षण विभाग, राजकिय शिक्षण विभाग, विविध कार्य वाहिण्या इ.
२) सुनियोजीत कार्यक्रम— Planned Programmer
३) पाठपुरवा कार्यक्रम— Follow-up- Programmer
४) शिक्षकांना प्रलोभन देणे — Incentive to Teacher
५) विविध विषय तंत्राची नेमणूक — Appointment of subject expect
६) संशोधन — Research
७) निरीक्षकांची भूमिका — Role of Inspectors
८) विस्ताराची गरज — Need of Expansion
९) साधन व्यक्ती — Resource Person
१०) विषयावर शिक्षक संघटना — Subject Teacher Assocation

वरील सर्व प्रयत्न करुनही शासनाच्या उदासीनतेमुळे, तसेच शिक्षक प्रशिक्षण संस्थांची भरमसाठ वाढ, कुशल प्राध्यापकांची कमतरता व शासनाचे विना अनुदान तत्वामुळे शिक्षक प्रशिक्षणाची वाताहत झाली आहे.

**संदर्भ :—**

*शिक्षकांचे शिक्षण — डॉ. घोरमोडे के. यु./ डॉ. घोरमोडे कला.*
*अध्यापक भूमिका व कार्ये — डॉ. शिवणेकर ल.मा.*
*शिक्षण व अध्यापक शिक्षण — डॉ. कक्कड गुरुप्रसाद*
*डॉ. गायकवाड शशी*
*शिक्षक शिक्षण — डॉ. मोरे चंद्रकांत*
*डॉ. भिलेगावकर सदानंद*